**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष २ रे ● अंक ५९ वा ● सोमवार १५ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 59 | Date : 15/07/2024 blow Monday Page 4 Price 4

### आषाढी वारीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक

# विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी वारकरी, शेतकरी व कष्टकऱ्यांनाच प्राधान्य राहील : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**※ शासनाने यावर्षीपासून प्रत्येक दिंडीला वीस हजार रुपये अनुदान जाहीर केले होते त्यांच्या खात्यात जमाही झाले ※ आषाढी एकादशी दिवशी वाहतुकीचे योग्य नियोजन करावे, मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यामुळे सर्वसामान्य भाविकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता पोलीस विभागाने घ्यावी ※ वारकरी महामंडळ स्थापन झाले असून त्याचे मुख्यालय ही पंढरपूर येथे राहणार ※ पंढरपूर येथे १ हजार बेडच्या हॉस्पिटलसाठी आरोग्य विभागाने तात्काळ प्रस्ताव पाठवावा ※ पंढरपूर येथे येणाऱ्या १५ लाख भाविकांना मोफत पाणी बॉटल व मँगो ज्यूस बॉटल वाटप करण्यात येणार ※ पालखी मार्ग व पंढरपूर शहरातील रस्त्याच्या स्वच्छतेबद्दल मुख्यमंत्र्यांकडून प्रशासनाचे कौतुक**



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः राज्य शासनाने वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी पालखी मार्ग, विसावा व मुक्कामाची ठिकाणासह पंढरपूर शहरात सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाला सुचित केलेले होते. येथे वारकरी, शेतकरी व कष्टकरी यांचा त्रिवेणी संगम झालेला आहे व हे शासन ही त्यांचेच आहे. त्यामुळे विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी व्हीआयपी पेक्षा वारकरी, शेतकरी व कष्टकऱ्यांनाच प्राधान्य राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृहात आषाढी वारीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळीसार्वजनिक आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे, आमदार समाधान आवताडे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, नगरविकाचे उपसचिव तथा समन्वयक अनिरुद्ध जवळेकर, आरोग्य उपसंचालक डॉ.राधाकिशन पवार, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्याधिकारी प्रशांत जाधव तसेच संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री शिंदे पुढे म्हणाले की, पंढरपूर येथे विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भावी येतात व दर्शन रांगेत १८ तास उभे राहतात अशा भाविकांना दर्शनाला प्राधान्य मिळाले पाहिजे या दृष्टीने व्हीआयपी दर्शन बंद करण्याबाबत शासन प्रशासनाच्या पाठीमागे ठामपणे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पंढरपूर मध्ये येत असताना रस्त्याने देखील वारकऱ्यांच्या सगळीकडे दिंड्या पालख्या येत होत्या व एक भक्तीमय वातावरण होते. पालखी मार्ग व पंढरपूर शहरातील सर्व रस्ते स्वच्छ होते. परंतु प्रशासनाने चेंजिंग रूम ची संख्या वाढवावी तसेच चंद्रभागा नदीच्या दोन्ही बाजूला कचराकुंड्याची संख्या वाढवावी, आवश्यक मनुष्यबळ वाढवावे व संपूर्ण चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ राहील, याची दक्षता घ्यावी. पंढरपूर शहरातील एकाही पोलवर कोणाचेही कट आउट लावले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी व रस्ते मोकळे ठेवावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

पंढरपूर येथे येणाऱ्या १५ लाख वारकरी व भाविकांना मोफत पाण्याच्या बॉटल व मँगो ज्यूस देण्यात येणार आहे. हे वाटप करत असताना स्टॉलची संख्या वाढवावी व या ठिकाणी गर्दी होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. सर्व भाविकांना शुद्ध पाणी उपलब्ध होईल व सर्व ठिकाणी स्वच्छता राहील याबाबत अधिक जागरुक राहावे. शासनाने वारकऱ्यांसाठी स्वतंत्र वारकरी महामंडळाची स्थापना केली असून याचे मुख्यालय पंढरपूर येथेच राहणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी देऊन पंढरपूर शहराचा सर्वंकश विकास आराखडा त्वरित सादर करावा. तसेच राज्य शासनाने वारकरी यांच्या प्रत्येक दिंडी २० हजार रुपये जाहीर केलेले होते ते संबंधित दिंडी च्या बँक खात्यावर वितरीत झाल्याचेही त्यांनी सांगितले.

पंढरपूर शहरात महत्त्वाच्या चार वाऱ्या असतात. या कालावधीत लाखो नागरिक येथे येतात. तसेच प्रतिमहा हजारो नागरिक येथे दर्शनासाठी येतात, त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने १ हजार बेडच्या नवीन रुग्णालयासाठी स्वतंत्र प्रस्ताव आरोग्य विभागाने तात्काळ सादर करावा, त्यासाठी आवश्यक असलेला निधीही उपलब्ध करून देण्यात येईल. त्याप्रमाणेच नियोजित स्कायवॉक आणि दर्शन मंडपासाठी प्रशासनाने सादर केलेल्या १०० कोटीच्या प्रस्तावात दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी स्वतंत्र सोय करून तिरुपतीच्या धर्तीवर प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सुचित केले.

आषाढी एकादशी साठी पोलीस विभागाने वाहतुकीचे योग्य नियोजन करावे. पंढरपूर शहरात आलेल्या वारकरी व भाविकांना आपल्या वाहनाच्या ताफ्यामुळे कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही । पान २ वर

## कार्लोस अल्काराझ ठरला विम्बल्डन २०२४ चा चॅम्पियन!



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : कार्लोस अल्काराझने नोव्हाक जोकोविचचा अंतिम फेरीत पराभव करत विम्बल्डन २०२४चे जेतेपद पटकावले आहे. या विजयासह कार्लोस अल्काराझने सलग दुसऱ्यांदा विम्बल्डनचे विजेतेपद जिंकले. अल्काराझने अंतिम फेरीत जबरदस्त कामगिरी करत सरळ सेटमध्ये दिग्गज टेनिसपटू नोवाक जोकोविचला नमवले.२१ वर्षीय कार्लोस अल्काराझने पहिला आणि दुसरा सेट ६-२, ६-२ असा जिंकला. मात्र, तिसऱ्या सेटमध्ये नोवाकने चांगली सुरुवात केली होती. हा सेट ६-६ असा बरोबरीत होता, त्यानंतर टायब्रेकरमध्ये निर्णय घेण्यात आला. सुरुवातीपासूनच नोव्हाक जोकोविचवर अल्काराझ वरचढ दिसत होता. त्याने या माजी चॅम्पियन खेळाडूला पहिल्या सेटमध्ये टिकून राहण्याची संधी दिली नाही आणि ६-२ च्या फरकाने सहज जिंकला. दुसऱ्या सेटमध्येही सारखीच कामगिरी करत अल्काराझने तो सेट ६-२ ने जिंकला. तिसऱ्या सेटमध्ये नोव्हाकने झुंज दिली आणि सामना टायब्रेकरपर्यंत नेण्यात यश मिळविले पण ते पुरेसे नव्हते. ७-६ अशा फरकाने शेवटचा सेट जिंकून अल्काराझने विजेतेपदावर कब्जा केला. २०२३ मध्येही हे दोन्ही टेनिसपटू विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात आमनेसामने आले होते, जिथे अल्काराझने । पान २ वर

## ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’अंतर्गत एकही पात्र महिला लाभापासून वंचित राहणार नाही : उपमुख्यमंत्री

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बारामती : ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’अंतर्गत समाजातील सर्व घटकातील पात्र महिलांना १ हजार ५०० रुपयांचा लाभ देण्यात येणार असून त्याकरीता महिलांनी ३१ ऑगस्ट पर्यंत अर्ज करावेत; राज्यातील एकही पात्र महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.

बारामती पंचायत समिती येथे ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेच्या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी





आमदार अमोल मिटकरी, उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, गटविकास अधिकारी डॉ.अनिल बागल, सहायक गटविकास अधिकारी नंदन जरांडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी अभिमान माने आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, राज्याच्या विकासाकरिता मांडण्यात आलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात समाजातील सर्व घटकांसाठी विविध योजनांचा समावेश केला आहे. राज्यातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वावलंबनाला । पान २ वर

## डोनाल्ड ट्रम्प हल्ल्यातून बचावले

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पेनसिल्व्हेनिया : अमेरिकेचे माजी अध्यक्ष आणि आगामी निवडणुकीतील उमेदवार डोनाल्ड ट्रम्प जीवघेण्या हल्ल्यातून बालंबाल बचावले. येथील सभेदरम्यान त्यांच्यावर गोळीबार झाला. एक गोळी कानाला चाटून गेली असून ते जखमी झाले असले तरी त्यांच्या जिवाला कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या घटनेनंतर अमेरिकेसह जगभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. नोव्हेंबरमध्ये अमेरिकेमध्ये होऊ। पान २ वर



**आपल्या देशात अशी घटना घडणे धक्कादायक आहे. माझ्या उजव्या कानाच्या वरच्या भागाला गोळी चाटून गेली आणि त्याच वेळी मला समजले की काहीतरी गडबड आहे. माझ्या कानात आवाज घुमला आणि नंतर गोळीबाराचे आवाज ऐकू आले. भरपूर रक्तस्राव झाला. देव अमेरिकेचे भले करो... – डोनाल्ड ट्रम्प, माजी अध्यक्ष, अमेरिका**

# वाखरीत शेवटच्या मुक्कामासाठी १२ लाख भाविक येणार, यंदा प्रथमच विस्तारीत पालखी तळाची संकल्पना

### आषाढी यात्रा : पायी चालत आलेल्या भाविकांच्या मसाजची सोय

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर ते फलटण या पालखी मार्गावर वाखरी (ता. पंढरपूर) येथे संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्र्वर महाराज पालखीचा शेवटचा मुक्काम असतो. यावर्षी शेवटच्या मुक्कामासाठी तब्बल ३० टक्के अतिरिक्त भाविक येण्याची शक्यता असल्यामुळे तब्बल १२ लाखांपेक्षा जास्त भाविक याठिकाणी येण्याचा अंदाज आहे. त्या धर्तीवर यंदा प्रथमच ६५ एकरच्या धर्तीवर वाखरीतही ५२ एकर परिसरात स्वतंत्र १५ एकर विस्तारीत पालखी तळाची संकल्पना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी राबविली आहे.. वाखरीच्या शेवटच्या मुक्कामासाठी संत तुकाराम महाराज, संत



ज्ञानेश्र्वर महाराज पालख्यांसोबत येणाऱ्या दिंड्या, भाविक यांच्याशिवाय इतर मार्गाने पंढरपूरकडे येणाऱ्या दिंड्या व पालख्याही माऊली-तुकोबाच्या भेटीसाठी वाखरी पालखी तळावर जात असतात. त्यामुळे पंढरपुरात दाखल होण्यापूर्वी संतांचा महामेळा वाखरी पालखी तळावर भरलेला असतो. त्यादृष्टीने त्यांना सोयीसुविधा देण्यासाठी वाखरी ग्रामपंचायत, पंढरपूर नगर परिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषदेमार्फत संपूर्ण जिल्हा प्रशासन सतर्क असते.वाखरी पालखी तळावर भाविकांसाठी ४ हजार सुलभ शौचालये उभारण्यात आली आहेत. ५०० स्नानगृहे, हिरकणी कक्ष, आपत्ती व्यवस्थापन कक्ष उभारले आहेत. वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी पालखी तळावर ठिकठिकाणी स्टॅन्डपोस्ट नळांची व्यवस्था केली आहे. टँकरना पाणी भरण्याची सोयही येथे केली आहे. आवश्यक त्या मोठ्या पालख्यांना राहुट्यांच्या जागी टँकर पुरविले जाणार आहेत. दिवाबत्तीची सोय व्हावी यासाठी ५५ ठिकाणी रोड लाईट, १० हायमास्ट दिवे पालखी तळावर बसविले आहेत. त्यामुळे रात्रीही हा पालखी तळ विद्युत रोषणाईने चकाकणार आहे. ठिकठिकाणी जंतुनाशक पावडर फवारणी, गप्पी मासे सोडणे, कंटेनर सर्व्हेक्षण, धूळ फवारणी आरोग्य विभागामार्फत भाविकांची काळजी घेतली जात आहे. पालखी तळ, रिंगण स्थळावर । पान २ वर

## पंतप्रधान मोदींचा अनोखा विक्रम; एक्सवर आता १० कोटी फॉलोअर्स, जागतिक नेत्यांना टाकलं मागे




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या प्रसिद्धीत आणखी वाढ झाली आहे. आज रविवारी (१४ जुलै) त्यांच्या एक्सवरील फॉलोअर्सच्या संख्येने १०० दशलक्ष म्हणजेच १० कोटींची संख्या पार केली आहे. मागच्या तीन वर्षांत त्यांच्या फॉलोअर्सच्या संख्येत । पान २ वर

# संपादकीय

## हेच आजचे राजकारण ..

हिदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे नाव या देशाच्या राष्ट्रीय प्रमुख व्यक्तींमध्ये सूचिबध्द झाले असल्यामुळे त्यांचे नाव आणि छायाचित्र आता सर्व पक्षांचे आणि विचारांचे झाले आहे. त्यामुळे सर्वच पक्ष आणि आघाड्या बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र आणि नाव आपापल्या निवडणूक प्रचारात आणि आघाडीच्या संकल्पनाम्यात किंवा वचननाम्यात वापरू शकतात. आता हा आनंदाचा आणि अभिमानाचाही मुद्दा आहे आणि अडचणींचाही. ज्या विचारांना बाळासाहेबांनी अनुसरले आणि भविष्यातील पिढ्यांनी ते अनुसरावे आणि पुढे न्यावे म्हणून ज्या समर्थ खांद्यावर त्यांनी आपल्या पक्षाची आणि संघटनेची जबाबदारी टाकली त्या उध्दव ठाकरे यांनाच आपल्याच पित्याच्या न्याय हक्कासाठी सर्वोच्च न्यायालयात सतत न्याय मागावा लागत आहे. म्हणून आता बाळासाहेबांच्या शिवसेनेला आणि उध्दव ठाकरे यांना न्याय देण्याची जबाबदारी ही सर्वोच्च न्यायालयाची आणि मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांची आहे. या देशात संविधान सर्वोच्च आहे, हेच कायद्याच्या विद्यार्थ्यांना शिकवले जाते. पण राजकारणाचे धडे गिरवताना आम्हाला हे शिकायला मिळाले की, विधानसभा आणि विधान परिषद तसेच लोकसभा आणि राज्यसभा ही सर्वोच्च सभागृह आहेत आणि त्यांच्यासमोर सर्वोच्च न्यायालय देखील थिटे आहे. कारण लोकशाहीच्या मूळ व्याख्येनुसार लोकांनी लोकांसाठी निवडलेले लोकांचे प्रतिनिधी त्या सभेत बसतात आणि कायदे करतात. ते कायदे मंडळ आहे. या कायदे मंडळाने सर्वानुमते किंवा बहुमताने जे कायदे पारित केलेले असतात ते सर्वोच्च न्यायालयालाही मान्य करावे लागतात. मुख्यमंत्री किंवा प्रधानमंत्रीही जेव्हा राज्यकारभार करतात तेव्हा मंत्रिमंडळ जे ठरवते त्यावर मुख्य वा प्रधानपदी बसलेल्याने शिक्कामोर्तब करणे अपेक्षित असते. पण स्वातंत्र्यानंतर आपल्या देशातील सामान्यांची मानसिकता ही राजा बोले प्रजा डोले, अशी असल्यामुळे जो मुख्य वा प्रधानपदी असेल त्याच्याकडेच निर्णयाचे अधिकार जातात. यामुळे काही वेळेला न्याय आणि संविधानही पायदळी तुडवले जाते. जसे यावेळेस झाले. म्हणूनच आता सगळी भिस्त आहे ती केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींवरच. निवडणूक आयोग आणि सभापती यांनी दिलेले निवाडे सर्वोच्च न्यायालयात निकालासाठी प्रलंबित आहेत. जातीनिहाय प्राधान्य हेच आजचे राजकारण झाले आहे.

पान १ वरुन

## वाखरीत शेवटच्या मुक्कामासाठी ..

स्वतंत्र आरोग्य व्यवस्था

प्रमुख संतांच्या पालख्या वाखरीत दाखल होण्याअगोदर वाखरी, बाजीराव विहिर येथे सर्वात मोठा गोल व उभे रिंगण सोहळा संपन्न होतो. याठिकाणीही होणारी गर्दी लक्षात घेता स्वतंत्र आरोग्य व्यवस्था तैनात करण्यात आली असून प्राथमिक उपचार, आवश्यक असल्यास म्ब्युलन्समधून इतर ठिकाणी ने-आण करण्याची सोय करण्यात आली आहे.

५००० झंडुबाम वाटप करणार.

आळंदी-देहू ते पंढरपूर या मार्गावर वाखरी हे शेवटचे मुक्कामाचे ठिकाण असते. त्यामुळे भाविक चालून चालून थकलेले असतात. त्यांना आरोग्याच्या सुविधा घेण्यासाठी इतर ठिकाणी जाणे अडचणीचे ठरत असल्याने पालखी तळावरच वाखरी ग्रामपंचायतीमार्फत भाविकांना तब्बल ५ हजार झंडुबाम व प्लॅस्टीकचा वापर टाळण्यासाठी ५ हजार कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात येणार असल्याचे ग्रामविकास अधिकारी सावता शिंदे यांनी सांगितले...

**मोफत मसाज सेंटर.** पायी चालून आलेल्या भाविकांचा थकवा घालविण्यासाठी वाखरी ग्रामपंचायतीमार्फत खास १२ लोकांची टीम मोफत मसाज करण्यासाठी पाचारण केली आहे. येथे आयुर्वेदिक तेलाने २० खुर्च्यांवर २४ तास मसाज करून भाविकांचा थकवा घालविण्यात येणार आहे.

**स्वतंत्र पालखी तळ संकल्पना राबविणार**...पंढरपुरातील गर्दी कमी करण्यासाठी प्रशासनाकडून नदी पलिकडे ६५ एकर पालखी तळाचा विकास करून भाविकांना सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे चंद्रभागा वाळवंट, शहरातील गर्दीचा ताण कमी झाला होता. त्याच धर्तीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वाखरी पालखी तळावर यावर्षी येणाऱ्या भाविकांच्या अधिकच्या संख्येमुळे प्रशासनावर ताण येऊन चेंगराचेंगरी होऊ नये म्हणून वाखरी-टाकळी बायपासच्या शेजारी ५२ एकर परिसरात स्वतंत्र १५ एकर पालखी तळ विकसीत करून त्याठिकाणी दिंड्यांच्या वास्तव्याची सोय करण्यात आली आहे. त्याठिकाणी दिंड्यांना रस्ते, पाणी, वीज आरोग्य सुविधा, भोजन देण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा उभी करण्यात आली आहे.

## विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी..

याची दक्षता पोलीस विभागाने घ्यावी. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. तसेच वारी कालावधीत हजारो पोलीस कर्मचारी सुरक्षेची जबाबदारी चोखपणे पार पाडत असतात त्यांच्यासाठी भोजनाची व्यवस्था योग्य प्रकारे व्हावी याकरिता आवश्यक असलेला निधी कायमस्वरूपी उपलब्ध करून देण्याबाबत शासन विचार करत आहे. पंढरपूर येथील आषाढी कार्तिकी वारीच्या पार्श्र्वभूमीवर स्वतंत्र निधी या पुढील काळात देण्याबाबत शासन सकारात्मक आहे त्या अनुषंगाने प्रस्ताव पाठवावा असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी पंढरपूर शहरात भक्तिमय वातावरण निर्माण होण्यासाठी जे साऊंड सिस्टिम निर्माण केली आहे त्याच्यावर भजन पूर्ण वारी कालावधीत व्यवस्थितपणे सुरू राहिले पाहिजे याची दक्षता प्रशासनांनी घ्यावी तसेच ग्राम विकास विभागाकडील वारीच्या अनुषंगाने देण्यात येणारा निधी हस्तांतरित केल्याचेही त्यांनी सांगितले. आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी आषाढी वारी संपल्यानंतर स्वच्छता अभियान राबवून संपूर्ण शहर तीन ते चार दिवसात स्वच्छ होईल यासाठी नियोजन करावे तसेच आषाढी दिवशी वाहतूक नियंत्रण योग्य राहील याची दक्षता घ्यावी त्याप्रमाणेच पंढरपूर शहरात नवीन १००० बेड साठी आवश्यक असलेला निधी आरोग्य विभागाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येईल त्याचप्रमाणे वारी कालावधीत पोलीस कर्मचाऱ्यांच्या जेवणाची व्यवस्था भेरवनाथ शुगरच्या सीएसआर फंडातून करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री भुसे यांनी ६५ एकरवर येणाऱ्या दिंड्याच्या सोयीसुविधासाठी एक चांगला विकास आराखडा तयार करून शासनाला सादर करावा. वारकरी मंडळ पंढरपूर येथेच होणार आहे त्यासाठी जागा उपलब्ध करून ठेवावी तसेच शहरात कोणत्याही प्रकारची आपत्ती उद्भवणार नाही यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करावे अशा सूचना केल्या. यावेळी विभागीय आयुक्त यांनीही ज्या दिंड्यांची नोंदणी झालेली आहे त्या दिंड्यांना शासनाने जाहीर केलेले वीस हजार रुपये त्यांच्या खात्यावर जमा केल्याची माहिती दिली. पोलीस अधीक्षक सरदेशपांडे यांनी कायदा व सुव्यवस्था बाबत माहिती देऊन आषाढीच्या दिवशी वाहतुकीचे अत्यंत कटाक्षाने नियोजन करण्यात येईल असे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी जिल्हा परिषदेच्यावतीने वारकऱ्यांसाठी केलेल्या सुविधांची माहिती सांगितली. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आषाढी वारीनिमित्त जिल्हा प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधा विषयी माहिती दिली. तसेच वारी कालावधीत कोणत्याही भाविकाला सुविधा अपुऱ्या पडणार नाहीत त्याची काळजी प्रशासन घेत असल्याचे सांगितले. तसेच माननीय मुख्यमंत्री महोदय व मंत्री महोदयांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे सुविधांमध्ये आणखी वाढ करून घेण्यात येईल असे सांगितले. तसेच स्कायवॉक आणि दर्शन मंडपासाठी प्रशासन प्रस्ताव तयार करत असून तो तिरुपतीच्या धर्तीवर असल्याचे त्यांनी सांगितले.

# बार्टी तर्फे संविधान दिंडीचे वेळापूर नगरीमध्ये उद्‌घाटनपर कार्यक्रम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वेळापूर/प्रतिनिधीः डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक, सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली संत ज्ञानेश्र्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर यावर्षी ही संविधान दिंडी चे वेळापूर नगरीमध्ये मा. धैर्यशील मोहिते पाटील खासदार,माढा सोलापूर यांच्या हस्ते करण्यात आला कार्यक्रमाचे विशेष उपस्थिती श्री.उत्तम जानकर संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती व वेळापूर सरपंच श्रीरजनीश बनसोडे. मिलिंद सरतापे या सर्वांच्या विशेष उपस्थितीमध्ये आयोजन करण्यात आले .

महाराष्ट्रातील आराध्य दैवत संत ज्ञानेश्र्वर महाराज आणि जगदुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान आषाढी वारीस सुरुवात झाली असून देहू व आळंदीत राज्याच्या कानाकोपऱ्यातून दिंड्या दाखल झालेल्या आहेत. जगदुरु श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान होण्याच्या मार्गावर ठिकठिकाणी बार्टीचा संविधान रथ ही संविधाचा प्रचार-प्रसार करण्यास सज्ज झाले आहे. आषाढी वारी पालखी सोहळ्यात यंदा वारकऱ्यांचा प्रचंड उत्साह दिसून



येत आहे. बार्टीकडून पालखी सोहळ्यात संविधान दिंडीच्या माध्यमातून संविधानविषयक प्रबोधन करण्यासाठी संविधान रथ सजविण्यात आलेले आहे. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग महाराष्ट्र शासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी ) पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान दिंडीच्या माध्यमातून वारकरी बांधवांना भारतीय संविधानाची माहिती व्हावी, आपले अधिकार, कर्तव्याची जाणीव व्हावी तसेच संतांच्या समतावादी विचारांचा प्रसार व्हावा हा या संविधान दिडीचा हेतू आहे.

आज वेळापूर येथे संविधान शाहीर जलसा कार्यक्रम आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी संविधान सारखे उपक्रम बार्टीने हाती घेतल्यामुळे बार्टी संस्थेचे विशेष आभार मानले व असे मेळावे प्रत्येक जिल्ह्यामध्ये घेण्याबाबत सूचित केले. तसेच श्री उत्तम जानकर यांनी देखील संविधानाची जनजागृती करणे किती गरज आहे असे सांगून या उपक्रमाचे कौतुक केले व बार्टी संस्थेचे आभार मानले.

या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक श्री. सुनील वारे महासंचालक बार्टी तसेच निबंधक इंदिरा अस्वार, विभाग प्रमुख डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण, प्रकल्प व्यवस्थापक नसरीन तांबोळी व प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे ,समतादूत किरण वाघमारे, मुकुंद लोंढे, जोती ओव्हाळ केमेरामन राहुल कवडे या सर्वांनी हा कार्यक्रम अत्यंत सुंदर त्याने नियोजन करून कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण

चालना तसेच विविध सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना, महिलांना रिक्षा व्यवसायासाठी आर्थिक मदत देणारी 'पिंक ई-रिक्षा'योजना, महिलांना वर्षातून ३ सिलेंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, आठ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या मुलींना मोफत शिक्षण अशा विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना एक महत्वाकांक्षी योजना असून या योजनेसाठी एका वर्षाकरीता ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत २१ ते ६५ वर्षे वयोगटातील अडीच लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या पात्र महिलांनी ऑनलाईन अर्ज करावेत; ऑफलाईन पद्धतीने अर्ज करण्याकरीता गावतील अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, ग्रामसेवक आदी स्थानिक यंत्रणेशी संपर्क साधावा. अर्ज केल्यानंतर पात्र लाभार्थ्यांची यादीही प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

ऑगस्ट महिन्यात अर्ज केलेल्या महिलांनादेखील जुलै महिन्यापासून लाभ मिळणार असल्यामुळे महिलांनी अर्ज करण्याकरीता गर्दी करु नये. अर्ज करतांना येणाऱ्या अडचणीचे निराकारण करण्याचे काम प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे. पात्र महिलांना जुलै आणि ऑगस्ट असे दोन्ही महिन्याचे मिळून ३ हजार रुपये १९ ऑगस्टपर्यंत (रक्षाबंधन) थेट त्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात येणार आहे.जिल्ह्यात या योजनेअंतर्गत आजअखेर १ लाख ३४ हजार ४९८ इतके अर्ज दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी बारामती तालुक्यात ७ हजार ६४८ इतके अर्ज दाखल करण्यात आले आहेत. पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्यावतीने शुन्य रक्कमेवर आधारित महिलांचे खाते उघडण्यात येत आहे. सर्व घटकातील पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळण्याकरीता प्रशासनासोबत सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करावे. महिला वर्गांनी या योजनेचा लाभ घेण्याकरीता पुढे यावे, असे आवाहन श्री. पवार यांनी केले. यावेळी श्री. पवार यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत तालुक्यातील ५ महिलांचे प्रातिनिधिक स्वरूपात अर्ज स्वीकारण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बागल यांनी केले.

## कार्लोस अल्काराझ ठरला

बाजी मारली होती.२१ वर्षीय अल्काराझने अंतिम सामन्यात विजय मिळवण्याचा विक्रम कायम ठेवत आणखी एक ग्रँडस्लॅम जिंकले. अल्काराझने २०२२ मध्ये यूएस ओपनच्या रूपाने त्याच्या कारकिर्दीतील पहिले ग्रँड स्लॅम जेतेपद जिंकले होते. फ्रेंच ओपन आणि थळालश्रशवेप सलग जिंकणारा अल्काराझ आता सहावा खेळाडू ठरला आहे. एटीपी क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचणारा आणि गवत, माती आणि हार्ड कोर्टवर विजेतेपद पटकावणारा अल्काराझ, वयाची २२ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी दोन विम्बल्डन विजेतेपद पटकावणारा बोरिस बेकर आणि ब्योर्न बोर्ग यांच्यानंतरचा तिसरा खेळाडू ठरला आहे.

## डोनाल्ड ट्रम्प हल्लयातून ..

घातलेल्या निवडणुकीवरही या घटनेचा परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. निवडणुकीत ट्रम्प रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार असतील.

काय घडले?

* बटलर टाऊनमध्ये मोकळ्या मैदानावरील सभेवेळी ट्रम्प यांच्यावर गोळीबार. * हल्लेखोर थॉमस मॅथ्यू क्रूक्स (२०) घटनास्थळीच सुरक्षा रक्षकांच्या गोळीबारात ठार. * ट्रम्प यांच्या कानाला दुखापत, जिवाला धोका नाही. * अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांची ट्रम्प यांच्याशी चर्चा. * हल्लेखोर रिपब्लिकन पक्षाचा नोंदणीकृत मतदार होता. * त्याच्या वाहनामध्ये तसेच घरामध्ये तपास यंत्रणांना बॉम्ब तयार करण्याचे साहित्य आढळून आले आहे. * पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह जगभरातील नेत्यांकडून हल्लयाचा निषेध.

## पंतप्रधान मोदींचा अनोखा विक्रम;

जवळपास तीन कोटींनी वाढ झाल्याचे सांगितले जाते. सरकारी प्रतिनिधी असलेल्यांपैकी जगभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच सर्वाधिक फॉलोअर्स आहेत. स्वतः मोदी यांनी एक्सवर पोस्ट टाकून आपल्या फॉलोअर्सचे आभार मानत, ही बातमी शेअर केली आहे.

जागितक नेत्यांबाबत बोलायचे झाल्यास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन ३८.१ दशलक्ष, तुर्कियेचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगन यांचे २१.५ दशलक्ष फॉलोअर्स आहेत. भारतात पुढाऱ्यांची तुलना करायची झाल्यास पंतप्रधान मोदी हे फॉलोअर्सच्या संख्येत इतर नेत्यांपेक्षा खूप पुढे असल्याचे दिसते. आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांचे २७.५ दशलक्ष तर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे २६.४ दशलक्ष फॉलोअर्स आहेत.

पंतप्रधान मोदींनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, एक्सवर १०० दशलक्ष फॉलोअर्सचा टप्पा पार केला.



# तुळजापूर तालुक्यातील महसूल कर्मचारी बेमुदत संपावर जाणार : कर्मचारी संघटनेचा शासनाला इशारा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वागदरी/एस.के .गायकवाड : महाराष्ट्र शासन महसूल विभाग कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्या संदर्भात कसलाही सकारात्मक विचार करत नसल्याने दि.१० ते १५ जुलै २०२४ पर्यंत टप्प्याटप्प्याने आंदोलन करून दि.१५ जुलै २०२४ पासुन बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय महाराष्ट्रातील महसूल कर्मचारी संघटनेने घेतला असून त्या अनुषंगाने तुळजापूर तहसिल कार्यालयातील कर्मचारी यांनी संबंधित धाराशिव जिल्हाधिकारी डॉ सचिन ओम्बासे यांना लेखी कळविले असून संघटनेच्या निर्णयाचे समर्थन करत दि.१० जुलै २०२४ पासुन काळ्या फिती लावून काम करुन आंदोलनास सुरूवात केली आहे. या आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यात दि.११ जुलै रोजी तुळजापूर तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी यांनी कर्मचारी एक जुटीचा विजय असो आमच्या मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत अशी घोषणा बाजी करत जेवणाच्या सुट्टीत तहसिल कार्यालया समोर निदर्शने आंदोलन केले तर आंदोलन च्य तिसऱ्या टप्प्यात दि.१२ जुलै रोजी लेखनी बंद आंदोलन करून शासनाचे आपल्या मागण्या कडे लक्ष वेधण्यासाठी दिवसभर कामावर उपस्थित राहुन लेखनीबंद आंदोलन केले.याउपरही महाराष्ट्र शासनाने महसूल कर्मचाऱ्यांच्या मागण्या कडे दुर्लक्ष केल्यास दि.१५ जुलै २०२४ पासुन बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.या एकुणच आंदोलनात आवलन कारकुन निशिकांत भोज, बालाजी चामे, उज्वला भोगे,एन.बी.येलगुंडे,मंडल अधिकारी अमर गांधले, महसूल सहाय्यक प्रताप पाटील,शिवरूद्रा स्वामी,पी.जी.कानडे, समाधान पोथरे, बाळासाहेब पवार, शिपाई नागेश गायकवाड, गोपाळ सुरवसे, आनंद देशमुख, बालाजी घोगरे,एस.ए.राऊत,यु.एम.राऊत, आदी सह कर्मचारी यांनी महसूल कर्मचारी संघटनेने पुकारलेल्या सर्व आंदोलनात सहभागी होते तर दि.१५ जुलै पासून संघटनेने पुकारलेल्या बेमुदत संप आंदोलनात सहभागी होणार असल्याचे संबंधित जिल्हाधिकारी धाराशिव यांना लेखी कळविले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव

## केळीसदे कल्लू कल्लीनल्ली...!, कन्नड रोमांचन कन्नड..!, ई भूमी बण्णद बुगुरी..!, नुरू जन्मक्कू..!, 'संगित संजे' या सदाबहार कार्यक्रमाने श्रोते भारावले होते.

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री गणेश वंदना..!, केळीसदे कल्लू कल्लीनल्ली...!, कन्नड रोमांचन कन्नड..!, ई भूमी बण्णद बुगुरी..!, नुरू जन्मक्कू..!, अशा एक ना अनेक कन्नड भावगीते व भक्तीगीत, चित्रपट गीतांनी ख्यातनाम गायक राजेश कृष्णन यांच्या 'संगित संजे' या सदाबहार कार्यक्रमाने श्रोते भारावले होते.श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, रविवार दि. १४ जुलै रोजी सायंकाळी ७ वा. परमपूज्य मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्र्वर महास्वामीजी व पूज्य श्री बसवलिंग महास्वामीजी यांच्या शुभाशिर्वादाने सादरकर्ते कर्नाटकचे ख्यातनाम गायक राजेश कृष्णन व प्रसिध्द निवेदिका अनुपम भट आणि सहकारी बेंगळूर यांचा 'संगीत संजे' ह्या कन्नड कार्यक्रमाने चौथे पुष्प संपन्न झाले.या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन परमपूज्य मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्र्वर महास्वामीजी व विरक्त मठाचे मठाधिपती परम पूज्य बसवलिंग महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात डॉ. श्री व सौ शरणबसप्पा दामा, श्रीमती मल्लम्मा पसारे, उद्योजक बसवराज माशाळे, दत्तकुमार साखरे, अक्कलकोट लायन्स क्लबचे अध्यक्ष शिवानंद नंदर्गी, माजी नगरसेवक लक्ष्मीकांत धनशेट्टी, कन्नड साहित्य परिषदचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी, राजशेखर उमराणीकर, राजकुमार झिंगाडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

दरम्यान परमपूज्य मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्र्वर महास्वामीजी अन्नमंडळात आल्यानंतर स्वागत न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांनी केले. महास्वमिजींनी महाप्रसादालयाची पहाणी करून समाधान व्यक्त केले. याप्रसंगी लोकप्रिय कन्नड भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते - कर्नाटकचे ख्यातनाम गायक राजेश कृष्णन, महिला गायकी पृथ्वी भट, सहगायक संतोष देव, रविराज, नटराज शेट्टीकेरे व प्रसिध्द निवेदिका अनुपम भट आणि सहकारी बेंगळूर यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. यावेळी न्यासाचे विश्र्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, रुपाली रामदासी, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त भाऊ कापसे,



राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले, मनोज निकम, प्रा.शरणप्पा आचलेर, अरविंद शिंदे, शीतल फुटाणे, राजु नवले, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, सौरभ मोरे, अँड.संतोष खोबरे, अविनाश मंगरुळे, प्रमोद लोकापुरे, कांत झिपरे, चेतन साखरे, सिद्धेश्र्वर मोरे, विठ्ठल तेली, सुरेश पाटील, सायबण्णा जाधव, बाळासाहेब घाटगे, प्रसाद हुल्ले, बसवराज क्यार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्र्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.

**गुणवंत विद्यार्थी गौरव : तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ७ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.**

**गुणीजन गौरव : यामध्ये विशेष गौरव पुरस्कार जेष्ठ ज्योतिष अभ्यासक पंचय्या स्वामी व सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक इरेश बागेवाडी, अक्कलकोट घडामोडीचे धोंडप्पा नंदे, उपशिक्षक गुरुय्या बसलिंगय्या सलगर यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

**दि. १५ जुलै रोजी सोमवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत ख्यातनाम व्याख्याते प्रा.नितीन बानुगडे-पाटील यांचे 'छत्रपती संभाजी महाराज' या विषयावर व्याख्यान सादर होणार आहे.**

### मोठ्या बहिणीचे घर म्हणजे महाराष्ट्र, तर छोट्या बहिणीचा कार्यक्रम म्हणजे कर्नाटक :

**आजचा दिवशी संपन्न होणाऱ्या कार्यक्रम महाराष्ट्रात होत असलेल्या कार्य कर्नाटक कार्यक्रम म्हणजे मोठ्या बहिणीच्या घरी छोट्या बहिणीचा कार्यक्रम आहे. मोठ्या बहिणीचे घर महाराष्ट्र, तर छोट्या बहिणीचा कार्यक्रम म्हणजे कर्नाटक. कर्नाटकाचे ख्यातनाम गायक राजेश कृष्णन व सर्व संगीत कलाकारावर श्री स्वामी समर्थ कृपा आशीर्वाद सदैव राहील असे लिहून परमपूज्य मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्र्वर महास्वामीजी यांनी आशीर्वचन दिले.**

# मेहकर तालुक्याचे संदिप गवई 'ठरणार अनेकांची डोकेदुखी!

## सामान्य कार्यकर्त्याच्या उमेदवारीची चर्चाच लय भारी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे : तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांची तळगाळातील जनतेशी असलेली नाळ, व्यापक जनसंपर्क अन कामांचा पाठपुरावा करून सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्याचा घेतलेला ध्यास या गुणवैशिष्ट्यांमुळे सध्या मेहकर विधानसभेत संदिप गवई यांचे नाव चर्चिल्या जात आहे. रस्त्यावरचा कार्यकर्ता अशी ओळख असणारे व्यक्तिमत्व म्हणजे तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई, सामाजिक कार्यमध्ये विविध उपक्रम राबविणारे, रक्तदान शिबिरे,विवाह सोहळा,पुरस्कार सोहळा, गुणवंत विद्यार्थी सत्कार,शासकीय योजना, विद्यार्थीचे शालेय प्रश्न,शेतकरी शेतमजुरांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न,महिला सक्षमीकरणाचे प्रश्न मार्गी लावणे तसेच गोरगरिबांच्या अडीअडचणीमध्ये धावून जाणे या गुणविशेषयावर ते निलेश लंके सारखे होऊ शकतात यावर आता चर्चा झडत आहे. विधानसभा निवडणुकीत हा भिडू अनेकांची डोकेदुखी ठरू शकतो. तिकडे निलेश लंके या सामान्य माणसाने प्रस्थापित व्यवस्थेशी दोन हात करून विजय मिळवला याला कारण ठरला तो त्यांचा रस्त्यावरचा अडीअडचणीला धावून जाणे, मेहकर मध्ये हॉस्पिटलचे कुठलेही काम असो वा सरकारी ऑफिस मधले काम असेल तर सर्वांना आठवतो तो रस्त्यावरचा कार्यकर्ता संदिप गवई तथागत ग्रुप संघटनेच्या माध्यमातून संदिप गवई गेल्या पंधरा वर्षापासून कार्यरत आहे. संघटनात्मक पातळीवर मोठं काम त्यांचे सुरू आहे. सध्या विधानसभेची लगीन



गाई सुरू असून अनेकांची नावे उमेदवारीसाठी चर्चेत जात आहेत. त्यामध्ये संदिप गवई हे नाव सुद्धा घेतले जाते. सध्या युती व महाआघाडीचे राजकारण सुरू आहे. जागा वाटपात जागा कुठल्या पक्षाला सुटणार हे गुलदस्ता असला तरी अनेकांनी मात्र आपली तयारी चालवली आहे. काही उमेदवार हे प्रस्थापित उमेदवार आहेत तर काही उमेदवारांना कुठलीही पार्श्र्वभूमी नाही. ते स्वकर्तृत्वाने पुढे येण्याचा प्रयत्न करीत आहेत. संदिप गवई हे मेहकर शहरातील सामान्य कुटुबांमधील आहे कुठला ही राजकिय वारसा नसलेले ते सर्व समाजासाठी तथागत ग्रुप ह्या संघटनेच्यामाध्यमातुन संपुर्ण महाराष्ट्रात एक आगळी वेगळी ओळख निर्माण करणारे युवक आहेत मेहकरच्या राजकीय पटलावर उदय संघर्ष सामान्य माणसाच्या पावले आहे. हाकेला धावून जाणारा कार्यकर्ता अशी ओळख असणारे संदिप गवई हे आपल्या कामाच्या बळावर अनेकांच्या काळजात धडकी भरवू शकतात. सध्या राजकारणाचा ट्रेंड बदलला आहे. लोकसभा निवडणुकीत याची झलक दिसूनही आली. निलेश लंके हे त्याचे मोठे उदाहरण ठरलेत. कुठलीही पार्श्र्वभूमी नसताना एखादा रस्त्यावरचा सामान्य माणूस विधानसभेत जाईल हे तर दिवा स्वप्नच परंतु जिद्द आणि चिकाटी जनसामान्यांचा पाठिंबा असेल तर काय होऊ शकते हे लंके यांनी दाखवून दिले. मेहकर तालुक्यात लंके अशी वोळख असणारे संदिप गवई यांनी कंबर कसल्याने सद्या या कार्यकर्त्यांच्या उमेदवारीची चर्चा रंगत आहे.

# धनगर व एन टी प्रवर्गातील तरुणांना बिनव्याजी कर्ज देणार : मुख्यमंत्री

## शिष्टमंडळाला मुख्यमंत्र्यांचे आश्वासन ; एकादशीला विठ्ठल मंदिराला शेळ्या मेंढ्यासह प्रदक्षणा घालण्याचे आंदोलन स्थगित

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर धनगर व एन टी प्रवर्गातील तरुणांना बिनव्याजी कर्ज तात्काळ मिळावे .पंढरपूर शहरात अहिल्या भवन उभारण्यास शासने जागा उपलब्ध करून डिपीटीसीतुन ५ कोटी निधी मिळावा .पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेची भूमी हिन दाखल्याची अट रद्द करण्यात यावी व हि योजना तात्काळ सुरू करावी.यासह इतर प्रमुख मागण्यासाठी जिल्ह्यासह राज्यभरातील धनगर समाज आक्रमक झाला होता. आंदोलनाचा इशारा दिला होता. परंतु परवा जिल्हाधिकाऱ्यांनी यावर तोडगा काढत दोन मागण्या मान्य केल्या होत्या. तर आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व मागण्या मान्य करीत राज्यातील धनगर व एन टी प्रवर्गातील तरुणांना बिनव्याजी कर्ज देण्याची घोषणा केली.व आगामी होणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकीत याला मंजुरी घेऊन तात्काळ यावर सरकार आदेश काढेल असे अश्र्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.त्यामुळे धनगर समाजाने शेळ्या मेंढ्या सहित विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा घालणार असल्याचे आंदोलन स्थगित केले असल्याची माहिती माऊली हळणवर यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे विठ्ठलाच्या महापुजेला येण्यापुर्वी आमच्या मागण्याची पुर्तता करूनच यावे अन्यथा आषाढी एकादशी दिवशी पहाटे दोन वाजता शेळ्या मेंढ्या सहित विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा घालणार असा इशारा सकल धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने सरकारला निवेदनाद्वारे दिला होता.आता सर्व मागण्या मान्य केल्याने यापुढे आंदोलन न करता सकल धनगर समाज मुख्यमंत्र्यांचे जंगी स्वागत करणार आहे. यावेळी ,जिल्हाधिकारी आशिर्वाद, माऊली हळणवर,प्रसाद कोळेकर,विश्रांती भुसनर,अमोल बापु कारंडे,,संजय लवटे ,प्रशांत घोडके अदित्य फत्तेपुरकर,पंकज देवकते,आदीसह समाज बांधव उपस्थित होते

अहिल्या भवन उभारण्यासाठी तात्काळ कारवाई करा

पंढरपूर शहरात पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवन उभारण्यासाठी जागा व निधी तर शहरात असणाऱ्या पुतळ्याच्या सुशोभिकरण कामाला निधी उपलब्ध करून तात्काळ कामाला सुरुवात करा अशया सुचना मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी यांना दिल्या.

# सलगर जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेची शालेय मंत्रिमंडळाची वार्षिक निवडणूक संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई :अमोल धडके : लोकशाहीच्या व्याख्येनुसार लोकांद्वारे, लोकांनी केलेले, लोकांसाठी राज्य म्हणजेच लोकशाही होय. लोकशाही ही अशी शासनप्रणाली आहे. ज्याच्या अंतर्गत जनता निवडणुकीत उतरलेल्या कोणत्याही पक्षाला आपले मत देऊन आपले प्रतिनिधी निवडू शकते. आणि आपले सरकार स्थापन करू शकते. लोकशाहीची मुख्य तत्त्वे आहेत- स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, स्वाभिमान आणि सहिष्णुता ह्याच धरतीवर जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगर मध्ये शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय मंत्रिमंडळातील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदासाठी वार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम संपन्न झाला.




शालेय मंत्रिमंडळातील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदासाठी निवडणूक कार्यक्रम दि.१३ जुलै २०२४ रोजी पार पडली. शालेय मंत्रिमंडळातील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदासाठी इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली. कु. साक्षी गजानंद स्वामी, कु. नवेता शिवराज पाटील, कु. तनुजा उमेश शिंगे, उमेदवार होते.जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील इयत्ता सहावी ते सातवीच्या एकूण ५१ मतदारांपैकी ५१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता आपल्या आवडत्या उमेदवाराला आपले मत देत मतदान पेटीत जमा केले. अतिशय शांततेत शालेय मंत्रिमंडळातील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाच्या सन २०२४-२५ चया वार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम संपन्न झाला.

शाळेतील ज्येष्ठ शिक्षक हणमंतराव गुंडरगी, मल्लिनाथ चनपटणे यांनी निवडणूक अधिकाऱ्याची भूमिका सांभाळली. तर अनिता काटकर, हाजराबी बागवान,संध्या बशेट्टी यांनी मतदान अधिकाऱ्याची भूमिका सांभाळली. सदर निवडणूक यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.सदर शालेय मंत्रिमंडळातील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदासाठीच्या सन २०२४-२५ च्या वार्षिक निवडणुकीची मतमोजणी सोमवार दि.१५ जुलै २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगर मध्ये होणार आहे.

# विठ्ठल रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन बंद केल्याने भाविकांमधून समाधान व्यक्त

सोलापूर/प्रतिनिधीः श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन प्रशासनाने बंद केल्याने तासनतास विठ्ठल दर्शनासाठी रांगेत उभे असलेल्या हजारो भाविकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तसेच सर्वसामान्य भाविक वारकरी यांच्यासाठी विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन सेवा २४ तास उपलब्ध केली असल्यानेही भाविक अत्यंतिक समाधानी झालेले आहेत. मागील काही दिवसापासून पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकडून व्हीआयपी दर्शना बाबत नाराजी व्यक्त केली जात होती. सर्वसामान्य भाविक १० ते ३० तासापर्यंत दर्शन रांगेत उभा राहून श्री विठ्ठलाचे दर्शन घेत होता, परंतु व्हीआयपी दर्शनामुळे हा सर्वसामान्य भावीक नाराज झालेला होता. जिल्हा प्रशासन व मंदिर प्रशासनाने भाविकांच्या या नाराजीची दखल घेऊन सर्व प्रकारचे व्हीआयपी दर्शन बंद केलेले आहे. त्यामुळे दर्शन रांगेतील सर्वसामान्य भाविकांना दर्शन घेण्यास कमी कालावधी लागत आहे. तसेच प्रशासनाने विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनाची सेवा २४ तास उपलब्ध करून दिली असल्याने सर्वसामान्य भाविक अत्यंत समाधानी झालेला आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी भाविकांना खूप वेळ दर्शन रांगेत थांबावे लागते. परंतु काही लोकांना व्हीआयपी दर्शन मिळत असल्याने आम्हाला वाईट वाटत होते. परंतु प्रशासनाने ही व्हीआयपी दर्शनाची पद्धत बंद केली असल्याने आम्हाला दर्शनाला कमी वेळ लागत असून एक प्रकारचे समाधानही मिळत आहे. प्रशासनाने पंढरपूर शहरात दिलेल्या सोयी सुविधा बद्दलही समाधान आहे. भाविक - **श्रीकांत कदम, सांगली.**

विठ्ठल रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन प्रशासनाने बंद केल्यामुळे सर्वसामान्य भाविकांना आनंद झालेला आहे आमचेही खूप लवकर दर्शन झाले आम्ही मुंबईवरून विठू माऊलीच्या दर्शनासाठी आलेलो आहे. आमचे दर्शन खूप छान झाले व दर्शन रांगेतील सुविधाही खूप चांगल्या होत्या. २४ तास दर्शनाची व्यवस्था केल्याबद्दल ही प्रशासनाचे आभार! **भाविक - आकाश भंगे, मुंबई.**

# आर्वी-अमरावती रोड वरील नव्याने तयार केलेल्या नाल्यांचे बांधकाम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे : गौतम कुंभारे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वर्धा/प्रतिनीधीः स्थानिक आर्वी-अमरावती मार्गावरील नव्याने केलेले रोडवरील नाल्यांचे बांधकाम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे दिसून आले आहे. कारण सदर नाल्यांवर शेफ गार्ड लावलेले नाही, तसेच पावसाळ्यातील पाणी सदर नाल्यांद्वारे न वाहता रोडवरच साचून राहत आहे.

त्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरीकांना तसेच शाळकरी मुलांना सदर नाल्यांचा व ब्रेकर नसल्या मुळे धोका निर्माण झालेला आहे. अशातच भविष्यात अपघात होऊन जिवहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी जबाबदार कोण ? असा सवाल गौतम अशोकराव कुंभारे अध्यक्ष, आदर्श एकता सामाजिक संघटना, आर्वी यांनी उपस्थित करून या समस्येवर लवकरात लवकर शासनाने तोडगा काढावा याकरिता उपविभागीय अधिकारी , आर्वी यांच्यामार्फत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर व मा. तहसीलदार साहेब,आर्वी यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे सन्मानिय मुख्यमंत्री साहेब यांना सदर निवेदन देण्यात आले आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष गौतम अशोकराव कुंभारे, उपाध्यक्ष प्रा.अमर काशिनाथ भोगे, सेजल डोंगरे, मधुकर सावळे मार्गदर्शक दीपक दहिया, अनिल तायडे,सौरभ सवई, विनोद कांबळे आनंद दहिया, बंटी माहुरे, प्रतीक कांबळे, अमोल गोडाने,मनोज गोंडणे, प्रशांत रामटेके,संजय ठाकूर,जितेंद्र भितकर, अविनाश गोंडणे,

प्रभाकर मनवर, प्रदीप, विजय कुंभारे जैन,अर्पित वाहने,पखाले, शोभीत कुंभारे तसेच आर्वी शहरातील आर्वी-अमरावती रोडवरील रहिवासी नागरीक व आदर्श एकता सामाजिक संघटनेचे कार्यकारणी मोठ्या संख्येने उपस्थित होते, त्यावेळी तात्काळ कारवाई न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

# निवासी शाळेने रचला पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इतिहास...!

## महाराष्ट्रात समाज कल्याण विभागात एकमेव शाळा : तब्बल आठ विद्यार्थी पात्र

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

गोदिंया/मुन्नाभाई नंदागवळी:शहराला लागून असणारे नंगपूरा-मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेच्या मागील २०२३-२४ सत्रामधील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, समाज कल्याण विभागातून संपूर्ण महाराष्ट्र राज्यामधून सदर शाळेतील तब्बल आठ विद्यार्थी ही पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र ठरले आहे. अशाप्रकारे या शाळेने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत एक इतिहासच रचला आहे. ही निवासी शाळा सहाय्यक आयुक्त समाज कल्याण गोदिंया अंतर्गत चालविली जाते. या शाळेमध्ये अनेक प्रकारचे उपक्रम राबविले जातात. अनेक प्रकारचे मार्गदर्शन दिले जातात. नवनवीन प्रकल्प हातात घेऊन विद्यार्थी सर्वांगीण विकासासाठी तयार करतात. यामध्ये शिक्षकांची अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली जात आहे.

क्रीडा, सांस्कृतिक, भूमिका अभिनय, नृत्यविष्कार, कला-कौशल्य, टाकाऊ पासून टिकाऊ, हस्तकला, झुंबा कवायत अशा माध्यमातून नाविन्यपूर्ण शिक्षणासह अभ्यासक्रम जास्तीत जास्त भर दिला जातो आहे. सदर शाळेत शासनाच्या सोयी, सुविधा ह्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना दिल्या जात आहेत. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा पात्र विद्यार्थी यांची विशेषत्वाने भेट घेण्यासाठी मुख्य आयुक्त यांच्या सांगण्यावरून प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण नागपूर येथील अधीकारी आले. पात्र विद्यार्थी यांच्यासी सुसंवाद साधून काही युक्त्या सांगितल्या. शाळेतील आठ विद्यार्थ्यांमध्ये संचित मोरेश्र्वर शाहारे, हेमंत गोवर्धन लाडे, तन्मय खेमराज साऊस्कार, सागर सुखदेव कोहरे, आयुष श्रीकृष्ण जांभूळकर, विकास नागोराव कराडे, सुजीत दिपक वालदे, धम्मदीप अश्रिवन खोब्रागडे पात्र ठरले. या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशासाठी मुख्याध्यापक रविशंकर इठूले, नीता भलमे, प्रदीप ढवळे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, मुन्नाभाई नंदागवळी, अर्चना चव्हाण यांनी अथक परिश्रम घेतले.

**राज्य व विभागीय स्तरावर अव्वल**

समाज कल्याण विभाग यात गोदिंया जिल्ह्यातील नंगपूरा-मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेच्या आठ विद्यार्थ्यांनी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा पात्र करून विभागाच्या राज्य व विभागात अव्वल आहे.



**समाज कल्याण विभागात या शाळेतील संपूर्ण राज्यात आणि विभागीय स्तरावर तब्बल आठ विद्यार्थी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले. ही गौरवाची बाब आहे. शाळा प्रगतीपथावर कार्य करत आहे. – विनोद मोहतूरे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गोदिंया.**




# लोकनेते दादासाहेब जाधवराव यांच्या वाढदिवसाच्या निमित्त भिवरी येथे गणवेश वाटप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुरंदर/प्रतिनिधी : माजी कृषी व माजी सैनिक कल्याण राज्य मंत्री दादासाहेब जाधवराव यांचा वाढदिवस आषाढी एकादशीच्या दिवशी असतो त्याचे औचित्य साधून श्री गणेश अपंग विकास प्रतिष्ठान तर्फे श्री कानिफनाथ विद्यालय भिवरी तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथे गणवेश वाटप कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी माजी मुख्याध्यापक मनोहर कामठे यांनी विचार व्यक्त केले व त्यांनी सांगितले की दादांनी गोरगरीब लोकांना आधार देत त्यांच्या जीवनात आनंद फुलवित अन्याय विरुद्ध संघर्ष करत सर्वसामान्य माणसांमध्ये ऊर्जा निर्माण करण्याचे काम केले दादांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कार्यकर्ते घडले,श्री गणेश अपंग विकास प्रतिष्ठानने अत्यंत मोलाचा कार्यक्रम आदरणीय दादांच्या वाढदिवसानिमित्त भिवरी येथील श्री कानिफनाथ विद्यालयामध्ये अत्यंत उत्साहाच्या वातावरण मध्ये घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भिवरी गावच्या सरपंच सौ मोनाली कटके व प्रमुख पाहुणे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री मनोहर कामठे सर हे होते श्री गणेश अपंग विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री गुलाब अप्पा घिसरे यांच्या माध्यमातून गेली वीस वर्ष विद्यार्थ्यांना गणवेश वाटप व शालेय उपयोगी वस्तू चे वाटप केले जाते.सदर कार्यक्रमासाठी पुरंदर शिक्षक प्रसारक मंडळाचे संचालक व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गुलाब आप्पा घिसरे,स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष सखाराम कटके,माजी सरपंच दिलीप कटके, संजय कटके,विशाल कटके, सोपान कुंजीर,सुरेखा ढवळे,मस्कु दळवी,पप्पू येवले,माजी मुख्याध्यापक हनुमंत कामटे सर, बाळासाहेब नाटकर,प्रकाश कटके, तुकाराम कटके,भाऊसाहेब दळवी,शेखर कटके, हरिदास गायकवाड,केरबा शेलार,नवनाथ कटके,महादेव फडतरे, अनिल ढवळे, रवींद्र कटके, मनोहर घिसरे या सर्व मान्यवरांच्या उपस्थिती त कार्यक्रम पार पडला.सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक श्री विजय गुरव सर यांनी केले सूत्रसंचालन सौ मोहिनी लोणकर यांनी केले व शेवटी सर्वां चे आभार श्री भाऊसाहेब दळवी यांनी मानले.



# युवक काँग्रेस अक्कलकोट तालुका अध्यक्ष बाबासाहेब पाटील यांचे राजीनामा नामंजूर

## जिल्हा जिल्हाध्यक्षांनी केले लोकसभेतील कामाचे कौतुक

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः युवक काँग्रेस अक्कलकोट तालुका अध्यक्ष बाबासाहेब पाटील यांचे राजीनामा नामंजूर करण्यात आल्याचे पत्र जिल्हा अध्यक्ष सूनंजय पवार यांनी दिले अक्कलकोट तालुक्याचे युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष झाल्यापासून युवकांना सोबत घेऊन तालुक्यातील युवा फळी एकत्र संघटित करून तालुक्यात मरगळलेल्या अवस्थेत असलेले काँग्रेस पक्षला ऊर्जा निर्माण करण्यासाठी काम बाबासाहेब पाटील यांनी केले असून लोकसभेच्या निवडणुकीत युवक काँग्रेसने अक्कलकोट तालुक्यात चांगल्या प्रकारे काम केले असून बाबासाहेब पाटील यांनी त्याच्या टीमला सोबत घेऊन चांगल्या प्रकारे मेहनत घेतल्याने पक्ष मजबूत होत आहे.

बाबासाहेब पाटील व त्याच्या सोबतचे युवक काँग्रेसचे सर्व पदाधिकारी यांचे कुठलेही काम , अडीअडचणी सोडविण्यासाठी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे व मी स्वतः तुमच्या तुमच्यासोबत असल्याचे जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार यांनी म्हणाले यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बाबासाहेब पाटील म्हणाले की, काँग्रेस पक्ष मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील असून यापुढे युवकांचे कुठलेही समस्या अडीअडचणी सोडविण्याचे आश्र्वासन माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे व जिल्हा अध्यक्ष सुनंजय पवार यांनी दिले असून येत्या काळात युवक काँग्रेस विधानसभा निवडणुकीत सर्व पदाधिकारी आणि

आमचे टीम कामाला लागले आहे. यावेळी मा. मंत्री. सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार, जि.प सदस्य मल्लिकार्जुन पाटील, युवक काँग्रेस अध्यक्ष बाबासाहेब पाटील, सुनील खवळे,विनीत पाटील, मुजीप नदाफ, इराण्णा धसाडे, राहुल साळुंखे,अयाज चंदनवाले, आकाश निंगदल्ले, राहुल मोरे, नितीश राठोड, संदीप चव्हाण,वसीम कुरेशी, कशीनाथ लोड्डेनौर, रतन बिराजदार यासह युवक काँग्रेसचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते

# सरस्वती विद्यालयात बरसल्या पाऊस गीतांच्या आनंदसरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : बाहेर खरोखरच बरसणारा पाऊस, मुलांच्या डोक्यावर टांगलेल्या रंगीबेरंगी छत्र्या, समोर पडद्यावर पावसाळी वातावरणाची अनुभूती देणारे कागदी ढग, कागदी होड्या, उडणारी फुलपाखरे ..से सारेच पावसाची अनुभूती देणारे वातावरण मनाला भुरळ घालत होते.मनाला मोहित करणारा हा सगळा देखावा होता सरस्वती विद्यालय महात्मा गांधी रोड नाशिक या शाळेत. अन् निमित्त होते स्व. बाबासाहेब वैशंपायन यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त गुंफण्यात आलेले पाचवे पुष्प.दिनांक १३ जुलै शनिवार रोजी पाऊसगाणी या कार्यक्रमात मुलांच्या मनातील पाऊस मुलांना भेटायला आला आणि खरोखरच आनंदाने मुले ओलीचिंब झाली.

पाऊस गाण्यांसोबतच आईवर आधारित अतिशय सुरेख कविता आणि गाणी ऐकून मुले हरखून गेली.कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रकाशजी वैशंपायन उपाध्यक्ष प्रभाकरजी कुलकर्णी, संस्थेचे सेक्रेटरी हेमंतजी बरकले , यांनी शुभेच्छा दिल्या. पाऊसगाणी या कार्यक्रमाचे सादरकर्ते बालसाहित्यिक ,कवी राजेंद्र सोमवंशी तसेच त्यांना साथसंगत देणारे सुहास सुरळीकर व राजतिलक अनाप यांनी मुलांसोबत साऱ्यांनाच मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचा प्रारंभ स्व. बाबासाहेब वैशंपायन व स्व.आईसाहेब वैशंपायन यांच्या प्रतिमा पूजनाने झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे चेअरमन रवींद्रजी कदम यांनी केले. बालवयात असलेलं पाऊस आणि पावसाची गाणी यांच नातं किती अतूट असतं आणि मनाला किती आनंद देतं ते कदम सरांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितले. शाळेच्या अधीक्षिका श्रीम.सुरेखा कमोद या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. या




आनंददायी कार्यक्रमाची संकल्पना शाळेचे चेअरमन रवींद्रजी कदम यांची होती

तर विशेष सहकार्य श्रीम. कमोद यांनी केले. कार्यक्रम संपूच नये असे वाटत असताना मुलांना आवडणाऱ्या एका छानशा गाण्यावर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. मुलांचे आनंदी चेहरे आणि पावसाने अधिकच आनंदी झालेले वातावरण यामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली.

स्कुल कमिटी सदस्य . विजय शिरसाट,सकाळ सत्रप्रमुख . माधुरी जोशी ,दुपारसत्र प्रमुख सौ. सरला तायडे व सर्व शिक्षक वृंद कार्यक्रमाला उपस्थित होते. उपस्थितांचे आभार शाळेच्या मुख्या. सौ अनुराधा बस्ते यांनी व्यक्त केले. शाळेतील शिक्षिका सौ कविता ठाकरे यांच्या संकल्पनेतून व इतर शिक्षकांच्या मदतीने ही अभिनव सजावट करण्यात आली होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता पाटील यांनी केले.

# ज्ञान का दीपक जलाना है बाल विवाह मिटाना है : सुनील पुजारी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नळदुर्ग/प्रतिनिधीः ज्ञानदीप कलोपासक मंडळ नळदुर्ग संचलित धरित्री विद्यालयात आज दिनांक १४ जुलै २०२४रोजी *युनिसेफ लोकप्रबोधन संस्था आरळी बुद्रुक तुळजापूर या संस्थेद्वारे *बालविवाह व लिंगभाव समस्या या विषयावर उद्बोधन सत्र अवलंबण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक सुनील पुजारी होते. प्रमुख वक्ते युनिसेफ संस्था तुळजापूर येथील स्वयंसेविका श्रीमती प्रियंका पावशेरे उपस्थित होत्या. कार्यक्रमा ची सुरुवात इतिहासाचे रंग रूप हे या गीताने झाली.प्रियंका पावशेरे यांचे स्वागत मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. आपल्या मार्गदर्शनामध्ये प्रियांका पावशेर यांनी सर्वप्रथम कमी वयात लग्न न



करण्याविषयीची घोषवाक्य विद्यार्थ्यांकडून म्हणून घेतले. नंतर त्यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम या विषयाशी संबंधित छोटासा खेळ घेतला. यात विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाले होते. तसेच तूरडाळ, मुगडाळ, तांदूळ, मसूर डाळ एकत्रित करून चार मुलांना सर्व धान्य वेगवेगळे करायला सांगितले तर मुलींजवळ काही पैसे देऊन त्याचे योग्य नियोजन करण्यास सांगितले. या उपक्रमातून त्यांनी मुलांचा घरातील कामांमध्ये सहभाग तर मुलींना आर्थिक स्वावलंबन देणे गरजेचे आहे हे सांगितले. शाळेतील इयत्ता दहावीतील भाग्यश्री पिस्के,नागीणी हुल्ले, गौरी पाटील व शामबाला नरवटे या विद्यार्थिनींनी बालविवाह व लिंगभाव यावर आधारित माहितीपत्रकाचे वाचन केले. तसेच शाळेत या विषयावर आधारित निबंध स्पर्धा ,वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्याबद्दल प्रियांका पावशेरे यांनी सांगितले.शाळेचे मुख्याध्यापक *सुनील पुजारी यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ याची विद्यार्थ्यांना माहिती दिली. बालविवाह केल्यावर येणाऱ्या *शारीरिक व मानसिक समस्यांचा उहापोह केला.लहान वयात लग्न केल्यावर *आर्थिक जबाबदारी पेलताना होणारी मुलांची व कौटुंबिक जबाबदारी पार पाडताना होणारी मुलींची ओढाताण याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती केली. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक सातलगावकर अण्णाप्पा यांनी *स्त्री पुरुष समानता व निरोगी सामाजिक व कौटुंबिक वातावरणासाठी स्त्री आणि पुरुष या दोघांनीही आपापली जबाबदारी ओळखत एकमेकांच्या सहकार्याने यशस्वी जीवनाची वाटचाल*कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी कारंजे यांनी केले तर आभार होळे युवराज यांनी मानले. सर्व विद्यार्थ्यांनी चर्चासत्र ,खेळ, घोषवाक्य यामध्ये आनंदाने उत्साहाने आपला सहभाग नोंदवला. शिक्षक व सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# स्वेरीत प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी प्रवेशासाठी ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रिया दि.१४ जुलै पासुन सुरु

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'प्रथम वर्ष इंजिनिअरिंग (पदवी) च्या प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया रविवार, दि.१४ जुलै २०२४ पासून सुरु झाली असून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी. ६२२०) म्हणून मान्यताही मिळालेली आहे. ही रजिस्ट्रेशन प्रक्रिया बुधवार, दि.२४ जुलै २०२४ (सायं. ५.००) पर्यंत चालणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या https://cetcell.mahacet.org या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या




नियोजनात्मक मार्गदर्शनाखाली स्वेरी अभियांत्रिकी मध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशनची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, मूळ कागदपत्रे अपलोड करणे आदी बाबींचा समावेश आहे. पदवी अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठीची ही प्रक्रिया दि.१४ जुलै २०२४ पासून ते दि.२४ जुलै २०२४ (सायं.५.०० वा.) पर्यंत चालेल तर कागदपत्रे पडताळणी करून खात्री करणे यासाठी दि. १४ जुलै २०२४ पासून गुरुवार, दि. २५ जुलै २०२४ (सायं.५.०० वा.) पर्यंत मुदत दिली आहे. रजिस्ट्रेशनसाठी येताना विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवर्गानुसार असलेली सर्व मूळ कागदपत्रे घेऊन यावीत तसेच स्वतःचा मोबाइल/नंबर सोबत असावा.

'सदरची नोंदणी यशस्वीपणे आणि बिनचूकपणे केलेले विद्यार्थीच शासनाच्या कॅप राऊंडसाठी पात्र राहतील. सदर कॅप राऊंड मधून प्रवेशित विद्यार्थीच शासनाच्या वेगवेगळ्या सवलती घेण्यास पात्र राहतील. त्यामुळे ही प्रवेश नोंदणी प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असून सर्व विद्यार्थी व पालकांनी स्वेरीत येऊन ही प्रक्रिया येथील तज्ञ शिक्षकांमार्फत पूर्ण करून घ्यावी.' असे आवाहन प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी केले आहे. अभियांत्रिकीच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी अधिष्ठाता प्रा.करण पाटील (९५९५९२११५४) व प्रा. यु.एल.अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.